महाराष्ट्र शासन

**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**

**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in

**Website:** www.jdroamt.org
**Fax No:** (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /प्रवेश/२०२४/ 2169
दिनांक :- 30/8/2024

**प्रति,**

**प्राचार्य,**
शासकीय तंत्रनिकेतन,
अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशिम/मुर्तिजापुर/अचलपुर.
डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती (अनुदानित)

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमाची अतिरीक्त फेरी राबविण्याबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची आपल्या संस्थेत संस्थानिहाय **दिनांक ४/०९/२०२४ ते ६/०९/२०२४** पर्यंत अतिरीक्त फेरी तसेच **दिनांक ९/९/२०२४ ते १०/९/२०२४** पर्यंत अंतिम अतिरीक्त फेरी राबविली जाणार आहे. सदर फेरी राबविण्यात येत असतांना तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांची प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमाच्या माहीती पुस्तकेमध्ये दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करावे व त्यामध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपल्या स्तरावरुन नियमानुसार प्रवेशाबाबतची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच आपल्या संस्थेमध्ये राबविण्यात येणा-या प्रवेश प्रक्रियेबाबतची या कार्यालयाव्दारे वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली जाहीरात सोबत जोडलेली आहे. तसेच आपल्या संस्थमध्ये रिक्त असलेल्या जागांची माहीती आपल्या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात यावी.

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- १. प्राचार्य,** सर्व खाजगी अभियांत्रिकी पदवीका संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या जाहीरातीत नमुद दिनांकाप्रमाणे आपल्या स्तरावरुन संस्थेत अतिरीक्त फेरी राबविण्यात यावी.

**२. प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ई-मेल करण्यासाठी.

D:/Advertisment

महाराष्ट्र शासन
**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.**
**शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.**
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in
**Website:** www.jdroamt.org
**Fax No:** (0721) 2577913

क्रमांक :- विकाअ/शिक्षण /प्रेस नोट/२०२४/

दिनांक :-

## जाहीरात

### शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाकरीता अतिरिक्त प्रवेश फेरी सुचना.

तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांच्या मार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे तिन फेऱ्यानंतर संस्थेमध्ये रिक्त राहिलेल्या जागांकरीता प्रवेशाची अतिरिक्त फेरी खालील संस्थांमध्ये संस्थास्तरावर घेण्यात येणार आहे. तरी सदर प्रवेश फेरीकरीता प्रवेश घेण्यास इच्छुक सर्व विद्यार्थ्यांनी (CAP अथवा Non CAP) आवश्यक त्या मुळ कागदपत्रांसह व विहीत शुल्कासह खालील तक्त्यात नमुद दिनांकास प्रवेशाकरीता त्या त्या संस्थेमध्ये हजर रहावे. याआधी इतरत्र प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी प्रोफार्मा N सादर करणे आवश्यक राहील. तसेच सदर विद्यार्थ्यांनी अगोदर प्रवेश घेतलेल्या संस्थांच्या प्राचार्यांकडून शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित केलेली प्रत सोबत सादर करावी.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | प्रवेश फेरीचे स्थळ | अतिरिक्त प्रवेश फेरीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती | सबंधित संस्थेत | ४/०९/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| २ | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ | सबंधित संस्थेत | ५/०९/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| ३ | शासकीय तंत्रनिकेतन, खामगाव | | | |
| ४ | शासकीय तंत्रनिकेतन, अचलपुर | | | |
| ५ | डॉ. पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन, अमरावती (अनुदानित) | | | |
| ६ | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापुर | सबंधित संस्थेत | ६/०९/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |
| ७ | शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम | | | |
| ८ | अमरावती/यवतमाळ/बुलढाणा/वाशिम/अकोला जिल्हयातील खाजगी विनाअनुदानित तंत्रनिकेतने | सबंधित संस्थेत | ६/०९/२०२४ | सकाळी १०.३० वाजता |

सदर फेरीनंतरही उर्वरित शिल्लक जागा असल्यास शासकीय व अनुदानित संस्थांमध्ये **दिनांक ९/९/२०२४** रोजी व **दिनांक १०/९/२०२४** रोजी शासकीय/अनुदानित व विनाअनुदानित तंत्रनिकेतनामध्ये अंतिम अतिरिक्त प्रवेश फेरी राबविली जाणार आहे. तरी सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी वेळापत्रकाप्रमाणे प्रवेशाबाबतची कार्यवाही करावी. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित संस्थेशी संपर्क साधावा. रिक्त जागांचा तपशिल व विहीत केलेले शुल्क संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर (website) उपलब्ध करुन दिलेले आहे.

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण, अमरावती.

D:/Advertisment